# शेकडो शेतकऱ्यांना कृषी मार्गदर्शन

## विविध स्पर्धांची मेजवानी : शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणा : महाराष्ट्र स्पर्धात्मक कृषी विकास प्रकल्प, आत्मा विभागांतर्गत तयार करण्यात आलेल्या आमगाव फार्मर प्रोड्युसर कंपनी ठाणा तर्फे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उदघाटन डॉ. एन.डी किरसान, अध्यक्षस्थानी देवरी येथील उपविभागीय कृषी अधिकारी जी.जी. तोडसाम, अतिथी म्हणून हिवरा येथील कार्यक्रम समन्वयक डॉ.एस.एस. देशमुख, जिल्हा अग्रणी बँकेचे दिलीप सिलारे, तालुका कृषी अधिकारी एल.एच. बन्सोड, अजय माहेश्वरी, हिराटोला येथील कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.एन. नंदेश्वर, गणेश खेडीकर, एम.व्ही. भोमतटे, कृषी



स्टॉल्सवर माहिती जाणून घेताना शेतकरी.

अधिकारी संजय ब्राम्हणकर, संत जयरामदास विद्याल ठाणाचे प्राचार्य सी.जी. पाऊलझगंडे, सुषमा शिवणकर, राहूल शेंगर, सरपंच अनिता आग्रे, जयराम बेंदवार, दुर्गा पटले, अनिरुध्द जोशी, प्रदीप बावनथडे, प्रमोद वंजारी, भारत गोंडाणे, बाबुराव कोरे, चित्ररेखा गिऱ्हेपुंजे, उमाशंकर शरणागत, मनोज कोरे उपस्थित होते.

यावेळी कृषी संदर्भात मार्गदर्शन करतांना शेतकऱ्यांना शेतीतून प्रगती कशी साधता येईल यावर मार्गदर्शन करण्यात आले. प्रास्ताविकेत बाबुराव कोरे म्हणाले, शेतीविषयक समस्या निपटारा करण्यासाठी उत्पादकांना तडजोडीची क्षमता निर्माण करणे आवश्यक आहे. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांचे गट स्थापन करुन शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात येईल असे म्हणाले. सर्व अतिथींनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांचे मनोगतही घेण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार शिवा हेमने यांनी केले. यशस्वीतेसाठी उमेद गट, संद्रीय शेती गट व शेतकऱ्यांनी व शेतकरी मित्रांनी सहकार्य केले.